सलामीच्या स्थानाबाबत साशंक - पंत

वृत्तसंस्था, लखनऊ

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या गतहंगामातील अपयशानंतर यंदा नव्या उमेदीने मैदानात उतरणाऱ्या ऋषभ पंतने पहिल्याच सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध सलामीला खेळण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय केवळ एका सामन्यापुरता होता की संपूर्ण हंगामात तोच सलामीलाच उतरणार, याचे थेट उत्तर पंतकडेही नाही.

नव्या हंगामातील सलामीच्या सामन्यात पंतच्या नेतृत्वाखालील लखनऊ सुपर जायंट्स संघाला दिल्ली कॅपिटल्सकडून हार पत्करावी लागली. घरच्या मैदानावरील या सामन्यात लखनऊच्या फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली. त्यातच पंतला नशिबाची साथ लाभली नाही. तो केवळ सात धावांवर असताना नॉन-स्ट्राईकवर धावचीत झाला. त्याचा सलामीचा जोडीदार मिचेल मार्शने समोरील दिशेस चेंडू मारला आणि तो गोलंदाजी करणाऱ्या मुकेश कुमारच्या हाताला लागून थेट यष्टींवर आदळला. त्यावेळी पंत क्रीजच्या बाहेर होता. त्यामुळे नव्या हंगामाची सुरुवातही त्याच्यासाठी फारशी चांगली झाली.

गेल्या हंगामात लखनऊसाठी मार्श आणि एडीन मार्करम यांनी सलामीला खेळताना चमक दाखवली होती. पंत मधल्या फळीत खेळताना अपयशी ठरला होता. त्यातच अनेकदा त्याने स्वतःच्या फलंदाजीचा क्रम बदलल्याने त्याच्यावर टीकाही झाली होती. यंदा तो तिसऱ्या क्रमांकावर खेळणार अशी चर्चा असताना त्याने पहिल्या सामन्यात सलामीला खेळण्याचे ठरवले. ट्वेन्टी-२० कारकीर्दीत त्याने केवळ २३ डावांत सलामीवीराची भूमिका बजावली असून त्यात एक शतक आणि पाच अर्धशतके साकारली आहे. आता पूर्ण हंगामात तू सलामीला खेळणार का, असे सामन्यानंतर विचारले असता, "अजून ते ५०-५० टक्के आहे. आम्ही विचार करत आहोत. मी संपूर्ण हंगामात आघाडीच्या फळीतच खेळणार हे मात्र नक्की," असे उत्तर पंतने दिले.

गतहंगामात सातत्याने तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या निकोलस पूरनला दिल्लीविरुद्ध पाचव्या क्रमांकावर खेळवण्याच्या निर्णयाचेही पंतने समर्थन केले. "मी सलामीला खेळल्याने मधल्या फळीत अनुभव असावा असा आमचा विचार होता. पूरन मधल्या षटकांत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवू शकतो. सुरुवातीला गडी गमावल्यास आयुष बदोनीला वरच्या क्रमांकावर पाठवायचे हे आम्ही आधीच ठरवले होते. त्याच्यासाठी ही मोठी संधी होती. मात्र, आमच्या योजनांना यश आले नाही," असे पंत म्हणाला.

तसेच फलंदाजांच्या अपयशामुळे दिल्लीसमोर केवळ १४२ धावांचे लक्ष्य ठेवल्यानंतर गोलंदाजीत अचूकता गरजेची होती. अशात १६ वाइड चेंडू टाकण्याचा आम्हाला फटका बसला, असे पंतने कबूल केले. "अवांतर धावांनी आमचा निश्चितपणे घात केला. कमी धावसंख्येचा बचाव करताना तुम्ही अधिक जोर लावून गोलंदाजी करता. अशा वेळी तुमच्याकडून चुका होऊ शकतात," असे पंतने नमूद केले.

निर्मिती क्षेत्राला घरघर

पश्चिम आशियातील युद्धामुळे मार्चमध्ये वाढीचा दर चार वर्षांतील नीचांकी

पीटीआय, नवी दिल्ली

पश्चिम आशियातील युद्धामुळे देशातील निर्मिती क्षेत्र मार्च महिन्यात घरघर लागल्याचे सरकारी मासिक सर्वेक्षणातून गुरुवारी समोर आले. युद्धामुळे बाजारपेठेत अस्थिरता वाढली असून, त्याचाच परिणाम होऊन नवीन कार्यादेश आणि उत्पादनात घट झाल्याचेही सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

देशातील निर्मिती क्षेत्राचा प्रवास नोंदविणाऱ्या एचएसबीसी इंडियाद्वारे निर्मिती क्षेत्रातील खरेदी व्यवस्थापकांचा कल जोखणाऱ्या सर्वेक्षणावर आधारित (पीएमआय) निर्देशांक मार्च महिन्यात ५३.९ गुणांवर नोंदविण्यात आला. त्याआधीच्या महिन्यात (फेब्रुवारी २०२६) निर्देशांक ५६.९ गुणांवर नोंदविला गेला होता. गेल्या महिन्यात निर्देशांकाने मागील चार वर्षांतील सर्वांत खराब कामगिरी नोंदविली आहे. निर्देशांक ५० गुणांवर असल्यास विस्तारपूरकता तर ५० गुणांखाली असल्यास आकुंचन दर्शवतो. निर्मिती क्षेत्राच्या वाढीचा वेग कमी झाला असला तरी रोजगार निर्मितीत मात्र वाढ झाली आहे. ही वाढ गेल्या सात महिन्यांतील सर्वाधिक ठरली आहे.

> देशाच्या पीएमआय निर्देशांकाने गेल्या महिन्यात जून २०२२ नंतरची नीचांकी पातळी गाठली आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला फटका बसला असून, त्याचा परिणाम देशातील निर्मिती क्षेत्रावर होत आहे. ॲल्युमिनियम, रसायने आणि इंधन यासह इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्या आहेत.
>
> – **प्रांजुल भंडारी**, मुख्य अर्थतज्ज्ञ, एचएसबीसी

नवीन कार्यादेश आणि उत्पादनातील वाढ मार्च महिन्यात कमी झालेली आहे. बाजारपेठेतील आव्हानात्मक स्थिती, किमतीची दबाव आणि पश्चिम आशियातील युद्ध हे घटक यासाठी प्रामुख्याने कारणीभूत ठरले आहेत. निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांवर किमतीचा दबाव वाढत असून, उत्पादनांच्या किमतीतील वाढ तुलनेने कमी आहे. अनेक कंपन्यांना नवीन ग्राहक मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागत आहेत.

कोलकाताविरुद्ध हैदराबादचे वर्चस्व

कोलकाता : हेन्रिक क्लासनचे (३५ चेंडूंत ५२) अर्धशतक, नितीश रेड्डीची (३९ धावा व २ बळी) अष्टपैलू कामगिरी आणि जयदेव उनाडकटच्या (३/२१) भेदक माऱ्याच्या जोरावर सनरायजर्स हैदराबाद संघाने 'आयपीएल'च्या सामन्यात गुरुवारी कोलकाता नाइट रायडर्स संघावर ६५ धावांनी मात केली. हैदराबादचा हा पहिला विजय, कोलकाताचा दुसरा पराभव ठरला.

ईडन गार्डन्स येथे झालेल्या या सामन्यात हैदराबादने दिलेल्या २२७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या कोलकाताने आक्रमक सुरुवात केली. मात्र, त्यानंतर त्यांना कामगिरीत सातत्य राखता आले नाही. अंगक्रिश रघुवंशी (५२) वगळता

कोलकाताच्या इतर फलंदाजांना फारसा प्रभाव पाडता आला नाही. त्यामुळे कोलकाताचा डाव १६१ धावांवर आटोपला.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजीस उतरलेल्या हैदराबाद संघाकडून ट्रॅव्हिस हेड (४६) व अभिषेक शर्मा (४८) या जोडीने पहिल्या गड्यासाठी ८२ धावा जोडल्या. हे दोघे माघारी परतल्यानंतर हैदराबादची अवस्था ४ बाद ११८ अशी झाली होती. मात्र, क्लासन आणि नितीश रेड्डीने (३९) हैदराबाद संघाला दोनशेपार पोहोचवले.

संक्षिप्त धावफलक

हैदराबाद : २० षटकांत ८ बाद २२६ (हेन्रिक क्लासन ५२, अभिषेक शर्मा ४८, ट्रॅव्हिस हेड ४६, नितीश कुमार रेड्डी ३९; ब्लेसिंग मुझराबानी ४/४१) **विजयी वि.** **कोलकाता :** १६ षटकांत सर्वबाद १६१ (अंगक्रिश रघुवंशी ५२, रिंकू सिंह ३५; जयदेव उनाडकट ३/२१, इशान मलिंगा २/१४, नितीश कुमार रेड्डी २/१७)

चेन्नईचे विजयी पुनरागमनाचे ध्येय

चेन्नई : सलामीच्या लढतीत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या चेन्नई सुपर किंग्जचे विजयी पुनरागमनाचे ध्येय असून 'आयपीएल'मध्ये आज, शुक्रवारी त्यांच्यासमोर पंजाब किंग्जचे आव्हान असेल.

राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या पहिल्या सामन्यात चेन्नईची सुरुवात चांगली झाली नाही. युवा खेळाडूंचा समावेश असलेल्या चेन्नईला गुवाहाटी येथे झालेल्या लढतीत सर्वच विभागांत झगडावे लागले. या पराभवाला मागे टाकत संघाला आता नव्याने मोहिमेची सुरुवात करावी लागेल.

चेन्नईच्या फलंदाजांना सलामीच्या सामन्यात अपयश आले होते. संजू सॅमसनला प्रभाव पाडता आला नाही. कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रेही झटपट बाद झाले. सुरुवातीलाच गडी गमावल्याने सर्फराज खानला 'प्रभावी खेळाडू' म्हणून खेळवण्यात आले. मात्र, या संधीचा सर्फराजला फायदा घेता आला नाही.

दुसरीकडे, पंजाब किंग्जने सलामीच्या लढतीत कठीण परिस्थितीत गुजरात टायटन्सविरुद्ध विजय मिळवला. त्यांना कूपर कोनोलीच्या रूपात तिसऱ्या स्थानावर चांगला फलंदाज मिळाला आहे. अनुभवी फिरकीपटू युजवेंद्र चहलने गेल्या सामन्यात प्रभावी गोलंदाजी केली. त्याने धावा रोखण्यासह दोन महत्त्वपूर्ण फलंदाजांना बाद केले. फलंदाजीत पंजाबची कर्णधार श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंगवर भिस्त असेल.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

आयटी, बँकिंगच्या जोरावर 'सेन्सेक्स'ची फेरउसळी

मुंबई : देशांतर्गत आघाडीवर माहिती तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या जोरदार 'व्हॅल्यू बाईंग'मुळे तसेच रुपयामध्ये झालेल्या जलद सुधारणेमुळे, प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स १८५ अंशांनी वधारला, तर निफ्टी २२,७०० पातळीच्या वर स्थिरावला.

सेन्सेक्स दिवसाच्या नीचांकी पातळीवरून २००० हून अधिक अंशांनी उसळी घेत अखेर १८५.२३ अंशांच्या वाढीसह ७३,३१९.५५ या पातळीवर बंद झाला. निर्देशांकाची सुरुवात घसरणीसह झाली होती आणि सत्राच्या पहिल्या सत्रात त्याने १,५८८ अंश गमावत ७१,५४५.८१ या दिवसाच्या नीचांकी पातळीवर पोहोचला होता. एचसीएल टेक आणि टीसीएससारख्या आघाडीच्या आयटी कंपन्यांमध्ये, तसेच एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेसारख्या बँकिंग क्षेत्रातील ब्लूचिप समभागांमध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजाराला सावरण्यास मदत झाली. परिणामी, सत्राच्या अखेरच्या टप्प्यात सेन्सेक्सने ७३,५६८.५४ या दिवसाच्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला.

मनप्पुरम होम फायनान्स लि.

पूर्वीची मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.
CIN: U65923KL2010PLC039179,
नोंदणीकृत कार्यालय: 8/596 ए, पद्मप्रभा बिल्डींग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरप्पू-थ्रीप्रयार रोड, थ्रीप्रयार, थ्रिसुर, केरळ-680567

मागणी सूचना

ज्याअर्थी, 8/596 ए, पद्मप्रभा बिल्डींग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरप्पू-थ्रीप्रयार रोड, थ्रीप्रयार, थ्रिसुर, केरळ - 680567 येथे नोंदणीकृत कार्यालय आणि भारतात विविध ठिकाणी शाखा असलेली मनप्पुरम होम फायनान्स लि. (यापुढे ''महोफिन'' असा उल्लेख करण्यात येईल) ही कंपनी अधिनियम, 1956 अंतर्गत स्थापित कंपनी आणि भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली द्वारे जारी करण्यात आलेल्या दि. 18 डिसेंबर, 2015 रोजीच्या अधिसूचना क्र. एस.ओ. 3466 (ई) सह वाचण्यात येणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे सदर अधिनियम असा उल्लेख करण्यात येईल) मधील अनुच्छेद 2 च्या उप-विभाग (1) च्या कलम (एम) मधील उप-कलम (iv) मधील अर्थाने इतर बाबींसह बांधकाम करण्यासाठी आणि / किंवा निवासी युनिट्स खरेदी करण्यासाठी कर्ज देणारी वित्तीय संस्था असून ज्याअर्थी, खाली स्तंभ क्र. 2 मध्ये नमूद कर्जदार / सह-कर्जदारांनी महोफिन कडून कर्ज प्राप्त केले आणि ज्याअर्थी, महोफिन हे सर्फेसी अधिनियमांतर्गत सुरक्षित धनको आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 2 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदार / सह-कर्जदारांना मागणी सूचना पाठवली ज्यात सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सदर सूचनेत नमूद रकमेची तीवरील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते, परंतु, विविध कारणांमुळे त्यांच्यापैकी काहींवर सदर सूचना बजावता आल्या नाहीत. की, याशिवाय खाली नमूद सदर कर्जदारांना सूचित करण्यासाठी सदर जाहीर सूचनेद्वारे ही माहिती देण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदारचे नाव / कर्ज खाते क्र. / शाखा	जीवर सुरक्षा हित निर्माण करण्यात आले होते त्या अनामत मत्तेचे वर्णन	एनपीए दिनांक	सूचना पाठविण्याचा दिनांक आणि थकबाकी रक्कम
1	भीमलता राजेश गजभिये, राजेश सुखदेव गजभिये, शुभम राजेश गजभिये / MHL00060035599 / नागपूर	गावठाण मौका नाकाडोंगरी, निवासी घर / मालमत्ता क्र. 1003, जमिनीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 1160 चौ.फू., सोबत तेथील आरसीसी बांधकाम, ग्रामपंचायत नाकाडोंगरी च्या अधिकार-क्षेत्रात, मु. पोस्ट वॉर्ड क्र. 1, नाकाडोंगरी, तह. तुमसर, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र, पिन- 441907. पूर्वेस- सिमेंट रोड, पश्चिमेस- विजय बनसोड यांचे घर, दक्षिणेस- धनेश सुकराम घोडीचोर यांचे घर, उत्तरेस- जीवलंग खोब्रागडे यांचे घर.	10-03-2026	14-03-2026 आणि रु. 723361/-

त्यामुळे, वर नमूद कर्जदार / सह-कर्जदारांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर संबंधित कर्जदार / सह-कर्जदारांच्या नावांसमोर नमूद एकूण थकबाकीचा सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करावा. संबंधित कर्जदार / सह-कर्जदारांनी एकूण थकबाकी रकमेचा पुढील व्याजासह भरणा न केल्यास महोफिन यांना वर नमूद अनामत मत्तेवर कारवाई करण्यासाठी अनु 13(4) अंतर्गत पावले उचलवी लागतील, सदर अधिनियम आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांतर्गत विहित करण्यात आलेल्या इतर मार्गांनी सूचना बजावण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. याद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(8) मध्ये दिल्यानुसार विक्रीद्वारे हस्तांतरासाठी जाहीर लिलाव किंवा खाजगी वाटाघाटीसाठी जाहीर सूचनेच्या दिनांकाअगोदर कोणत्याही वेळी संपूर्ण थकबाकी रकमेचा महोफिन यांना आलेल्या खर्चांसह आणि शुल्कांसह भरणा करून आपण सदर तारण सोडवून घेऊ शकता. कृपया लक्षात घ्यावे की सर्फेसी अधिनियमातील अनु. 13(13) अन्वये आपणांस विक्री भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही मार्गाने अनामत मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करण्यास किंवा तिचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

दिनांक: 03-04-2026 स्थान: महाराष्ट्र — स्वा/- प्राधिकृत अधिकारी, मनप्पुरम होम फायनान्स लि.

महानिर्मिती — ई-निविदा सूचना

महानिर्मिती महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वायू विद्युत केंद्र, उरण येथे खालील कामांच्या पुरवठा / कामांसाठी अनुभवी व प्रतिष्ठित उत्पादक/पुरवठादार/ कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या जात आहेत:

ई-निविदा	वर्णन	अंदाजित खर्च / ई.एम.डी (रु.)	विक्री कालावधी	भरण्याची अंतिम तारीख (११.०० तासांपर्यंत)
शुद्धिपत्र ई-निविदा ३००००६७०५०	वायू विद्युत केंद्र, उरण येथील बी१-बी२ बॉयलर क्षेत्रासाठी नवीन २-टन क्षमतेच्या विद्युतचलित होइस्टची उभारणी आणि कार्यान्वयनाचे काम करणेबाबत.	४८.५० लक्ष ५२,०००/-	०३.०४.२०२६ ते १०.०४.२०२६	११.०४.२०२६
ई-निविदा ३००००६७३७१	वायू विद्युत केंद्र, उरण येथे B1 WHR बॉयलर (MR12017) साठी LP इव्हेपोरेटर हेडर बसवण्याचे काम करणेबाबत.	१८९.२७ लक्ष १९२,७७०/-	०३.०४.२०२६ ते १०.०४.२०२६	११.०४.२०२६

सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु. ११८०/- निविदा खर्च आणि ई.एम.डी. केवळ ऑनलाइन भरणे.
आमच्या वेबसाइटवर दिनांक **०३.०४.२०२६** पासून विक्रीसाठी निविदा उपलब्ध आहेत किंवा अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाइटवर भेट द्या https://eprocurement.mahagenco.in
संपर्क तपशील :- EE (P&C) - 91-9167007841
विक्रेत्यांना विनंती कि ई-निविदेसाठी फर्म नोंदणी करून घ्यावी.
कृपया आमच्या वेबसाइटवर लॉगइन करा https://eprocurement.mahagenco.in

--sd--
Chief Engineers
GTPS Uran

सिडको — प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी)

सिडको शहरांचे शिल्पकार

खारघर, नवी मुंबई येथील इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कचा (आयसीएफ) विकास

"दि सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड" ("प्राधिकरण" किंवा "सिडको") हे कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट ऑपरेटर (सीडीओ) अ‍ॅग्रीमेंटद्वारा सर्वसमावेशकपणे मोठ्या भूखंडाचा विकास सुकर होण्याकरिता "मध्यवर्ती कल्पनेवर आधारित प्रतिष्ठित शहर विकासा"च्या राज्य सरकारच्या मान्यताप्राप्त धोरणावर आधारित खारघर, नवी मुंबई ("प्रकल्प") येथे अशा प्रकारचे पहिले प्रकल्प, **इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कचा (आयसीएफ) विकास** हाती घेण्याकरिता नामांकित विकासक / कंपन्यांकडून **प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी)** मागवीत आहेत.

आरएफपी अनुसूची

१) प्रसिद्धीची तारीख – **०६.०४.२०२६ रोजी स. ११.०० वा.**
२) कागदपत्रे डाऊनलोड/विक्री सुरू होणारी तारीख – **०६.०४.२०२६ रोजी स. ११.०० वा.**
३) कागदपत्रांची विक्री बंद होणारी तारीख – **१६.०५.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
४) आरएफपी सादरीकरण सुरू होणारी तारीख – **०६.०४.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
५) आरएफपी सादरीकरण बंद होणारी तारीख – **१६.०५.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
६) मूळ कागदपत्रांचे सादरीकरण – **२१.०५.२०२६ रोजी दु. ०४.०० वा.**
७) पूर्व-बोली सभेची तारीख – **२०.०४.२०२६ रोजी दु. ०३.०० वा.**
८) आरएफपी उघडण्याची तारीख – **१७.०५.२०२६ रोजी दु. ०३.०० वा.**
९) वित्तीय बोली उघडण्याची तारीख कळविण्यात येणार आहे.

महत्त्वाची सूचना :

१) सविस्तर आरएफपी कागदपत्रे महाराष्ट्र सरकार ई-टेंडरिंग पोर्टल : https://mahatenders.gov.in/nicgep/app यावरून डाऊनलोड करता येतील.
२) अर्जदार केवळ वरील पोर्टलमार्फत त्यांचे आरएफपीज ऑनलाइन सादर करतील.
३) शंका, जर असल्यास, mm.commercial@cidcoindia.com या ई-मेलद्वारा **०६.०४.२०२६ पासून ते १३.०४.२०२६ पर्यंत** पाठवता येतील.
४) शंकांकरिता प्रत्युत्तरे उशिरात उशिरा **२७.०४.२०२६** पर्यंत शुद्धिपत्रानुसार ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात येतील.
५) सिडको त्याकरिता कोणतेही कारण न दाखवता कोणताही किंवा सर्व आरएफपीज स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

विपणन व्यवस्थापक (वाणिज्यिक)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

NAGPUR MUNICIPAL CORPORATION
OFFLINE TENDER NOTICE

Commissioner NMC invites tenders for the following works. The Terms and Conditions of tenders and other details are available at the office of under signed and can be purchased from it.

Sr.No.	Name of Work	Tender Cost (in Rs.)	EMD (Rs.)
1	Dechoking of trees and Kerbing in Prabhag No. 31,32 and 34 in Zone No. 03.	557773/-	5600/-

Note :- 1) Cost of Blank Tender forms **(Rs.) 590/- 2)** Tender Sale & Submission start date **02.04.2026. 3)** Tender Sale & Submission End date **:- 09.04.2026** up to **5.00 pm. 4)** Date of Opening of Tender (if Possible) **:- 10.04.2026 at 5.00 pm. 5)** Time Limit & Class of Contractors: **3 Months**, I to VII.

Advt No 15 PR Date:2.4.2026 — **Executive Engineer, Zone No. 3, N.M.C., Nagpur.**

MAHINDRA RURAL HOUSING FINANCE LTD.

Corporate Office:- Agasty Corporate Park, Piramal, Amiti Building, Unit No. 203, 2nd Floor, B Wing, Sunder Bung, Kurla West, Mumbai Mahrashtra 400 070 India. CIN – U65922MH2007PLC169791
Branch Office :- Blackberry Tower, Office No. M7, Mezzanine Floor, Ratanlal Plot Square, Akola- 444001.

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी) नियम 8-(1)

ज्याअर्थी, सिक्युरिटाईजेशन आणि रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स एंड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे **(महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.)** चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(12) च्या सोबतच वाचले जाणारे रुल 8 आणि 9 च्या अंतर्गत खालील उल्लेखित कर्जदारांना डिमांड नोटिस सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती. कर्जदार रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिध्द ठरल्यामुळे कर्जदार तसेच आम जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचला जाणाऱ्या ॲक्ट कार्य क्र. 8 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्त्याने खालील दिलेल्या संपत्तीचा **प्रत्यक्ष ताबा** खालील उल्लेखित तारखेला घेतला आहे. विशेष करुन खालील कर्जदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.** व्याजासह प्रभाराधिन राहिल.

अनु. क्र.	कर्जदाराचे / जमानतदाराचे नाव (शाखेचे नाव)	सुरक्षित ठेविचे विवरण (अचल संपत्ती)	मागणी सुचनेची तारीख आणि रक्कम	ताबा घेतल्याची तारीख
1.	(कर्ज क्र. XRESAKO00322656 /393297, अकोला) इंद्रा बाळू इंगळे, बाळू गंगाराम इंगळे, हिंमतराव वामनराव देशमुख	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा, बांधकामासह बेअरिंग प्रिमायसेस ग्रामपंचायत घर क्रमांक 74, गाव – वरंगाव, एकूण जमीन क्षेत्रफळ 1475.00 चौ. फूट व त्यावरील 480.00 चौ. फूट बांधकाम, मौजा – वरंगाव, ता. पातूर व जि. अकोला येथे स्थित. चतुर्सिमा पुढीलप्रमाणे: पूर्व – बालू इंगळे यांचे घर, पश्चिम – रस्ता, उत्तर – रस्ता, दक्षिण – हरिभाऊ इंगळे यांचे घर	मागणी सूचना दिनांक 19/09/2020, रु. 1 ,52,455/- (रुपये एक लाख बावन्न हजार चारशे पंचावन्न फक्त) तसेच देयकाच्या तारखेपर्यंत त्यावर पुढील व्याज.	28/3/2026 (प्रत्यक्ष ताबा)
2.	(कर्ज क्र.: XRESAKO00803745/959 810, अकोला) इंदू पुंडलिक महोरे, शुभम पुंडलिक महोरे, भाग्यश्री सुभाषराव चंदणे, रतन गोतुराम सदानशिव	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा, बांधकामासह बेअरिंग प्रिमायसेस ग्रामपंचायत घर क्रमांक 186, गाव – सांगवी मोहाडी, एकूण जमीन क्षेत्रफळ 516.00 चौ. फूट व त्यावरील 264.00 चौ. फूट बांधकाम, मौजा – सांगवी मोहाडी, ता. व जि. अकोला येथे स्थित. चतुर्सिमा पुढीलप्रमाणे: पूर्व – शेत, पश्चिम – रस्ता, उत्तर – गोवर्धन चौधरी यांचे घर, दक्षिण – गजानन फकीरा महोरे यांचे घर	मागणी सूचना दिनांक 10/03/2022, रु. 110,989/- (रुपये एक लाख दहा हजार नऊशे एकोणनव्वद फक्त) तसेच देयकाच्या तारखेपर्यंत त्यावर पुढील व्याज.	30/3/2026 (प्रत्यक्ष ताबा)

स्थळ : यवतमाळ, अकोला, दिनांक : 03/04/2026 — सहि. अधिकृत अधिकारी, (महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.)

मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड

नोंदणी कार्यालय : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एस.टी. डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५
ग्राहक सेवा : ८२९१८८९८९८ वेबसाईट :www.motilaloswalhf.com ई-मेल : hfquery@motilaloswal.com

कब्जा सूचना (स्थावर मिळकत/तींकरिता)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. असे ज्ञात) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खालील नमूद तारखेस मागणी सूचना जारी करून पुढील कर्जदारांना सूचनेत नमूद रकमेची परतफेड सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यात पुढील कर्जदारांनी कसूर केली आहे, याद्वारे पुढील कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्न स्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टचे कलम १३ चे उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून वरील वर्णन केलेल्या मिळकतींचा कब्जा येथे खालील नमूद केलेल्या तारखांना घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र./कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार यांचे नाव	मागणी सूचनाची तारीख आणि थकबाकी	कब्जा घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्तेच्या पत्त्याचा समावेश असलेला, सदर मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि हिस्सा.
१	LXBUL00315-160020921 कर्जदार : रवींद्र जगराव चव्हाण सह-कर्जदार: उषा रवींद्र चव्हाण	२२-१२-२०२५ रोजीस रू. १७१७९५६/-	३१-०३-२०२६	मालमत्ता क्रमांक – १४०५, गट क्र. ३३६, मोजमाप क्षेत्र ८. ११ हे.आर., हिसा क्रमांक १ हेक्टर ०१ आर, मौजे – मु. मलकापूर पांगरा, सिंदखेड राजा, देवळगाव राजा, बुलढाणा, महाराष्ट्र सीमा – पूर्व: उत्तम दगडू पवार यांची जमीन; पश्चिम: काशिनाथ रामदास राठोड यांची जमीन; उत्तर: उर्वरित जमीन; दक्षिण: रस्ता.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार केल्यास **मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड** कडून येथे वरील नमूद करण्यात आलेल्या रकमेसह आणि त्यावर व्याज आकारले जाईल.
तारण मत्तांचे विमोचन करण्याकरिता उपलब्ध वेळेनुसार ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : महाराष्ट्र / दिनांक : ०३.०४.२०२६ — भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल. — सही/-, अधिकृत अधिकारी (मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड)

ICICI Bank

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., पहिला मजला, व्यावसायिक अपार्टमेंट क्र. १०१, श्रीजी कृपा टॉवर, सराफा बाजार रोड, इतवारी, नागपूर, महाराष्ट्र-४४०००२

जाहीर सूचना – तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]
स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ सह नियम ८(६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचा ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य लोक आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज्ड करण्यात आली असून, त्याचा प्रत्यक्ष ताबा आयसीआयसीआय बँक लि. चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे'' आणि ''तेथे जे असेल ते'' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्रं.	कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्री प्रमोद विजय कोरडे (कर्जदाराचे), श्रीमती संगिता विजय कोरडे (सह-कर्जदाराचे), कर्ज खाते क्रमांक LBADR00005815339 LBNAG00005869788	फ्लॅट क्र. बी४-बी-३०३, तिसरा मजला, ब्लॉक क्र. बी४, इमारत क्र. बी, क्लस्टर- नंद, वृंदावन, प्लॉट क्र. ७, ख. क्र. २४८, २५७/२, २५८/१-जी आणि २५८/१-के, २५८/२, मौजा- जामठा, नागपूर- ४४०००५. मोजमापित क्षेत्र-कार्पेट एरियाचे- ८९.३७ चौ.मी, बिल्ट अप एरिया- ८४.३३ चौ.मी, सुपर बिल्ट अप एरिया- १२६.५७ चौरस मीटर आणि जमिनीच्या भूखंडात अविभाजित वाटा ०.०५१९%	₹ ६४,२१, ६३०/- (मार्च ३०,२०२६ पर्यंत)	₹ २३,००, ०००/- / ₹ २,३०, ०००/-	एप्रिल १०,२०२६ सकाळी ११:०० दुपारी ०२:०० पर्यंत	एप्रिल २३, २०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव **(URL Link-https://disposalhub.com) मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड** या ई-लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **एप्रिल २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजण्यापूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआयबँक लि., पहिला मजला, व्यावसायिक अपार्टमेंट क्र. १०१, श्रीजी कृपा टॉवर, सराफा बाजार रोड, इतवारी, नागपूर, महाराष्ट्र- ४४०००२** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **एप्रिल २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **एप्रिल २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह – डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लि., पहिला मजला, व्यावसायिक अपार्टमेंट क्र. १०१, श्रीजी कृपा टॉवर, सराफा बाजार रोड, इतवारी, नागपूर, महाराष्ट्र-४४०००२** येथे **एप्रिल २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **नागपूर** येथे देय सादर करावा.
तपासणीसंबंधित, ई-लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया **आयसीआयसीआय बँक** कर्मचारी फोन नंबर **९३२६०६६६८०/९१६८६८८५२९** वर संपर्क करा.
कृपया नोंद घ्यावी की मार्केटिंग एजन्सीज **१. व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, २. ऑजिओ ॲसेट्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड ३. मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड ४. फिनविन इस्टेट डील टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड ५. गिरनारसॉफ्ट प्रायव्हेट लिमिटेड ६. हेक्टा प्रॉप टेक प्रायव्हेट लिमिटेड 7. आर्का एमार्ट प्रायव्हेट लिमिटेड ८. नोव्हेल ॲसेट सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड ९. नोब्रोकर टेक्नॉलॉजीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड १०. नवोदयन प्रॉपटेक प्रायव्हेट लिमिटेड** यांनादेखील सदर मालमत्तेच्या विक्री सुविधेसाठी नेमण्यात आले आहे.
कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.lclclbank.com/n4p4s**

दिनांक : एप्रिल ०३, २०२६ — प्राधिकृत अधिकारी,
ठिकाण : नागपूर — आयसीआयसीआय बँक लिमिटेड

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: 6वा मजला, बी बिल्डिंग, गंगा ट्रूनो, लोहगाव, पुणे, महाराष्ट्र - 411014
शाखा कार्यालय: कार्यालय क्र. 305, 3रा मजला, यमुना प्लाझा, मूर्तिजापूर महामार्ग, रामलता बिझनेस सेंटरजवळ, अकोला- 444001

ई-लिलाव-विक्री सूचना
सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित स्थावर मालमत्तेची विक्री

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 आणि 9 सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 ("कायदा") अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे /जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे कायद्यानुसार "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित), खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्यांच्याकडे गहाण ठेवल्या आहेत, कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत सूचनेनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियमाच्या नियम 8 आणि 9 सहवाचता कायद्याच्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सुरक्षित धनको यांनी ज्याचा ताबा अधिकृत अधिकारयाने घेतला आहे.
सुरक्षित मालमत्ता याची दि. 04-05-2026 रोजी ई-लिलावाद्वारे "जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "जे काही तिथे आहे" या तत्त्वावर विक्री करण्यात येतील. सर्वसामान्यांना येथे कळविण्यात येते की, आम्ही https://www.bankeauctions.com या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जाहीर करणार आहोत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया जीएचएफएल/सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच www.grihumhousing.com यावर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव {ए}	मागणी सूचना तारीख आणि थकबाकी रक्कम {बी}	ताब्याचे स्वरूप {सी}	मालमत्तेचे वर्णन {डी}	आरक्षित किंमत {ई}	ईएमडी (आरपीच्या 10%) {एफ}	ईएमडी सादर करण्याची तारीख {जी}	वाढीव बोली {एच}	मालमत्ता तपासणीची तारीख आणि वेळ {आय}	लिलावाची तारीख आणि वेळ {जे}	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरणे असल्यास {के}
1	कर्ज क्र. एलएपी060120000000 5007154 अनंतराव रामकृष्ण फाटकर (कर्जदार) संध्या अनंतराव फाटकर (सह कर्जदार)	सूचना दिनांक: 11-12-2025 एकूण देय थकबाकी रक्कम: रु. 10,33,874/- (रुपये दहा लाख तेहतीस हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त) दि. 11-12-2025 रोजीनुसार देय वसुली होईपर्यंत @ 16.35% प्रतिवर्ष दराने व्याजासह.	भौतिक	धारण जमीन ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 183, मौजे येरंडा, ता. बार्शीटाकळी आणि जि. अकोला मोजमापे 2542 चौ. फूट ग्रामपंचायत येरंडाच्या अधिकारक्षेत्रात ता. बार्शीटाकळी आणि जि. अकोला यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि मालमत्तेच्या सीमाः पूर्व बाजू - रस्ता. पश्चिम बाजू - विजय शिंदे यांची मालमत्ता. उत्तर बाजू - अनंत फाटकर यांची मालमत्ता. दक्षिण बाजू - अनंत फाटकर यांची मालमत्ता.	रु. 17,06,775.00/- (रुपये सतरा लाख सहा हजार सातशे पंच्याहत्तर फक्त)	रु. 1,70,677.50/- (रुपये एक लाख सत्तर हजार सहाशे सत्याहत्तर आणि पन्नास पैसे फक्त)	दि. 02-05-2026 रोजी सायं. 5.00 वाजेपूर्वी	10,000/-	27-04-2026 (सकाळी 11.00 वा. ते दुपारी 4.00 वा.)	04-05-2026 (सकाळी 11.00 वा. ते दुपारी 2.00 वा.)	शून्य

इच्छुक बोलीदारांना/खरेदीदारांना सुरक्षित कर्जदार शाखेला आणि लिलावाच्या मालमत्तेला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे, आणि बोली सादर करण्यापूर्वी स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्क, भार आणि कोणत्याही तृतीय पक्षाच्या हितसंबंधांची पडताळणी करावी आणि त्यासंबंधी सर्व बाबींमध्ये स्वतःचे समाधान करावे. सर्व वैधानिक देय जसे की मालमत्ता कर, वीज/पाणी देय आणि इतर कोणतीही देयके, जर असतील तर, निश्चित केली जातील आणि यशस्वी बोलीदाराने भरावीत.
इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड आगाऊ घेणे आवश्यक आहे, जे ई-बोली यासाठी अनिवार्य आहे, लिलाव सेवा प्रदात्याकडून) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. पत्ता- प्लॉट क्र.-68, 3रा मजला गुडगाव हरियाणा-122003. हेल्पलाइन क्र.- 7291981124,25,26 सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com. **संपर्क व्यक्ती - धरणी पी, ईमेल आयडी- dharani.p@c1india.com संपर्क क्र.- 9948182222.** कृपया लक्षात ठेवा की, संभाव्य बोलीदारांना त्यांच्याकडूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेता येईल. इच्छुक खरेदीदार/बोलीदाराने एनईएफटी/आरटीजीएस/डीडी याद्वारे इसारा ठेव अनामत (ईएमडी) ''गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'', बँक - आयसीआयसीआय बँक लिमिटेड, खाते क्र. -091551000028 आणि आयएफएससी कोड- आयसीआयसी0000915, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, पंचशील टेक पार्क, गणपती चौकाजवळ, 43/44 विमान नगर - 4111014 या खात्यात दि. 02-05-2026 रोजी किंवा त्यापूर्वी कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेत काढावी आणि https://www.bankeauctions.com यावर त्यांचे नाव नोंदणीकृत करावे आणि वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावा आणि सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण घ्यावे. वेबसाइटवर नोंदणी केल्यानंतर, इच्छुक खरेदीदार/बोलीदाराने खालील कागदपत्रांच्या प्रती अपलोड करून, ई-मेलद्वारे मिळवाव्यात आणि स्वतःची साक्षांकित हार्ड कॉपी पत्त्यावर पाठवावी - पत्ता: ऑफिस क्र. 305, 3रा मजला, यमुना प्लाझा, मूर्तिजापूर हायवे, रामलता बिझनेस सेंटरजवळ, अकोला-444001 मोबाईल क्र. +91 8281138143 ई-मेल आयडी p.adith@grihumhousing.com अटी आणि शर्तीविषयी अधिक माहितीसाठी, कृपया https://www.bankeauctions.com आणि ई-लिलावात सहभागी होण्यासाठी www.grihumhousing.com या संकेतस्थळांना भेट द्या.
सदर ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम-2002 च्या नियम 8(6) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार यांना 30 दिवसांची (तीस) सूचना म्हणून देखील विचारात घेतली पाहिजे.
कोणत्याही परिस्थितीत स्थानिक भाषेतील प्रकाशन आणि इंग्रजी वृत्तपत्र प्रकाशनातील मजकुरात काही फरक असल्यास, द इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी वृत्तपत्र भाषेतील मजकुराला प्राधान्य दिले जाईल.

दिनांक: 03.04.2026 ठिकाण: नागपूर — सही/- अधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६.
लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४००००. फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.